
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। रविवार, दि. २८ जून २०२६ । वर्ष १ ।अंक ८१ ।पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

फुलगाव ग्रामपंचायत पाच महिन्यांपासून ग्रामसेवकाविना
(पान २ वर)



» Selected

## माणगाव प्रेस क्लबचा खा.संजय दिना पाटील यांच्या वक्तव्याचा निषेध

बोरघर / माणगाव |ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना उद्देशून केलेल्या कथित आक्षेपार्ह आणि धमकीवजा वक्तव्याचा माणगाव तालुका प्रेस क्लबतर्फे तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी त्यांच्यावर तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करत माणगाव पोलीस ठाण्यात लेखी निवेदन देण्यात आले. माहितीनुसार, उद्धव ठाकरे गटातून शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर त्यांच्या राजकीय भूमिकेबाबत प्रतिक्रिया या घटनेनंतर राज्यभरातील विविध पत्रकार संघटनांनी संताप व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर माणगाव तालुका प्रेस क्लबचे मुख्य संघटक पद्माकर उभारे, कार्याध्यक्ष गौतम जाधव, सल्लागार उत्तम तांबे, सल्लागार विनोद सापळे, अध्यक्ष संतोष सुतार, उपाध्यक्ष विश्वास गायकवाड आणि सुनील राजभर यांनी माणगाव पोलीस ठाण्यात जाऊन निवेदन सादर केले.

### जी.एस. ग्राउंड ते रेल्वे स्थानक भक्ती, शिस्त आणि समर्पणाचा अद्वितीय सोहळा

# वारी हीच माझ्या जीवनातील सर्वात मोठी पुण्याई!

## वारकऱ्यांच्या आशीर्वादापेक्षा मोठी श्रीमंती नाही : पालकमंत्री गुलाबराव पाटील

जन सम्राट टाईम्स

**पाळधी / जळगाव आषाढी एकादशीनिमित्त जळगाव ग्रामीण मतदारसंघातील चार हजारांहून अधिक वारकरी बंधू-भगिनींना विशेष रेल्वेद्वारे श्रीक्षेत्र पंढरपूर येथे विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी रवाना करण्याचा भव्य सोहळा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या पुढाकारातून उत्साहात पार पडला. जी.एस. ग्राऊंड ते रेल्वे स्थानकापर्यंत निघालेल्या पालखी-दिंडीने संपूर्ण जळगाव शहर विठ्ठलनामाने दुमदुमून गेले.**

यावेळी बोलताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले, "वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची, समतेची आणि माणुसकीची जिवंत परंपरा आहे. गेल्या पाच वर्षांपासून हजारो वारकऱ्यांना पंढरपूर दर्शनाची सेवा करण्याचे भाग्य मला लाभले. वारकऱ्यांच्या आशीर्वादापेक्षा मोठी श्रीमंती नाही आणि वारी हीच माझ्या जीवनातील सर्वात मोठी पुण्याई आहे. विठ्ठलाने मला केवळ निमित्त बनविले, हेच माझे भाग्य आहे." कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोप्रेमी ह.भ.प. गजानन महाराज वरसाडेकर होते. जी.एस. ग्राऊंडवर दुपारपासून हजारो वारकरी एकत्र जमले होते. नोंदणीकृत भाविकांना ओळखपत्रे, प्रवास पास, आवश्यक साहित्य तसेच संपूर्ण प्रवासाची माहिती देण्यात आली. त्यानंतर नेहरू चौक मार्गे रेल्वे स्थानकापर्यंत



निघालेल्या पालखी-दिंडीत टाळ, मृदंग, वीणा, अभंग, फुगड्या, रिंगण आणि हरिनामाच्या अखंड गजरात वारकरी विठ्ठलभक्तीत तल्लीन झाले. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी स्वतः टाळ हातात घेऊन दिंडीत सहभाग नोंदवला. रेल्वे स्थानकावर विशेष रेल्वेच्या प्रत्येक डब्यात जाऊन त्यांनी वारकऱ्यांची विचारपूस केली. ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग भाविक तसेच इतर वारकऱ्यांच्या सुविधांची पाहणी करून रेल्वे सुटेपर्यंत ते स्थानकावर उपस्थित राहिले. या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन युवा नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील आणि GPS मित्र परिवाराने केले. नोंदणी, रेल्वेतील आसनव्यवस्था, डॉक्टरांचे पथक, प्रथमोपचार पेट्या, पिण्याचे पाणी, नाश्ता, भोजन, स्वयंसेवक, पंढरपूरमधील निवास, महाप्रसाद, दर्शन व्यवस्था आणि परतीच्या प्रवासाचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले. प्रत्येक रेल्वे डब्यात दोन स्वयंसेवक, वैद्यकीय मदत, औषधे, पिण्याचे पाणी, चहा-नाश्ता आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पंढरपूर येथे वारकऱ्यांसाठी निवास, चंद्रभागा स्नान, श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शन, नगरप्रदक्षिणा, हरिपाठ, भजन-कीर्तन आणि महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. यावेळी ह.भ.प. गजानन महाराज वरसाडेकर, समाधान महाराज भोजेकर, ज्ञानेश्वर महाराज, परमेश्वर महाराज पाळधीकर, पांडुरंग महाराज, अनिल महाराज, मयूर महाराज, गजानन महाराज धरणगावकर, मंगलसिंग महाराज, लाला महाराज, विठोबा महाराज, कृष्णा महाराज यांच्यासह जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे, माजी महापौर ललित कोल्हे, उपमहापौर मनोज चौधरी, नगरसेवक, टाळकरी, माळकरी, हजारो वारकरी उपस्थित होते.

### विठू माऊली तू...' गीताने भारावले वारकरी

जी.एस. ग्राऊंडवरील कार्यक्रमात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी स्वतः "विठू माऊली तू माऊली जगाची..." हे विठ्ठलभक्तीपर गीत सादर केले. त्यांच्या स्वरांना हजारो वारकऱ्यांनी टाळ-मृदंगाच्या निनादात उत्स्फूर्त साथ दिली. काही क्षणांतच संपूर्ण परिसर "विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल..." या अखंड नामगजराने दुमदुमून गेला. अनेक वारकऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले आणि भक्ती, श्रद्धा व समर्पणाचा अविस्मरणीय क्षण अनुभवायला मिळाला.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## शिरपूरमध्ये महिलेने एकाच वेळी तीन बाळांना दिला जन्म

### आईसह तिन्ही नवजात शिशू सुखरूप



जन सम्राट टाईम्स

**शिरपूर| प्रतिनिधी:** धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे एका गरोदर महिलेने एकाचवेळी तीन सुदृढ बाळांना जन्म दिल्याची दुर्मीळ आणि आनंददायी घटना घडली आहे. आईसह तिन्ही नवजात बालके सुखरूप असून त्यांच्यावर डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असल्याची माहिती प्रसूती करणारे डॉ. रणजीत पावरा यांनी दिली. मूळच्या पनाखेड येथील आणि सध्या शिरपूर तालुक्यात वास्तव्यास असलेल्या निर्मला मोरे यांची शिरपूर येथील एका खासगी रुग्णालयात यशस्वी प्रसूती करण्यात आली. अत्यंत आव्हानात्मक परिस्थिती असूनही सिझेरियनऐवजी नैसर्गिक पद्धतीने प्रसूती यशस्वीरीत्या पार पाडण्यात आल्याने वैद्यकीय क्षेत्रात या कामगिरीचे विशेष कौतुक होत आहे. या प्रसूतीमध्ये जन्मलेल्या पहिल्या बाळाचे वजन दीड किलो, दुसऱ्या बाळाचे वजन सुमारे सव्वादोन किलो, तर तिसऱ्या बाळाचे वजन दीड किलो असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. तिन्ही बाळांची प्रकृती स्थिर असून आईची प्रकृतीही समाधानकारक आहे. एकाचवेळी तीन बाळांचा जन्म झाल्यामुळे मोरे कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे गेल्या तीन महिन्यांत शिरपूरमध्ये अशा प्रकारची ही दुसरी घटना घडल्याने जिल्हाभरात या घटनेची चर्चा रंगली आहे. अत्यंत गुंतागुंतीच्या प्रसूतीमध्ये नैसर्गिक पद्धतीचा यशस्वी अवलंब करून आई व तिन्ही बाळांचे प्राण सुरक्षित राखल्याबद्दल डॉ. रणजीत पावरा आणि त्यांच्या वैद्यकीय पथकावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## ब्रिटनच्या संसदीय व्यवस्थेसह लोकशाही संस्थांचा अभ्यास करणार : डॉ. नेवे

### आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग; ब्रिटिश संसद, न्यायव्यवस्था व शैक्षणिक संस्थांचा करणार सखोल अभ्यास

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी:** कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद (ता. यावल) येथील राज्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक, संशोधक आणि सामाजिक-राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेले प्रा. डॉ. सुनील नेवे हे २६ जून ते ५ जुलै २०२६ या कालावधीत इंग्लंडमधील लंडन येथे आयोजित शैक्षणिक अभ्यास दौऱ्यावर जाणार आहेत. ब्रिटनची संसदीय लोकशाही, न्यायव्यवस्था, सार्वजनिक धोरणे, शैक्षणिक संस्था आणि प्रशासन व्यवस्थेचा प्रत्यक्ष अभ्यास करणे हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश आहे. भारतीय संसदीय व्यवस्थेवर ब्रिटिश संसदीय परंपरेचा मोठा प्रभाव असल्याने या अभ्यास दौऱ्यामुळे भारतीय लोकशाहीचे तुलनात्मक आकलन अधिक व्यापक होण्यास मदत होणार आहे. या दौऱ्यात प्रा. नेवे ब्रिटनच्या संसद भवनाला भेट देऊन हाऊस ऑफ कॉमन्स आणि हाऊस ऑफ लॉर्ड्स यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणार आहेत. तसेच पॅलेस




ऑफ वेस्टमिन्स्टर, पार्लमेंट स्क्वेअर आणि वेस्टमिन्स्टर ॲबे यांसारख्या ऐतिहासिक स्थळांनाही भेट देणार आहेत. राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने जागतिक कीर्तीच्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स (LSE) या संस्थेला भेट देऊन सामाजिक विज्ञान, सार्वजनिक धोरण, आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकीय संशोधनातील आधुनिक प्रवाहांचा अभ्यास करण्याची संधी त्यांना मिळणार आहे. याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडनमधील निवासस्थान, ब्रिटिश म्युझियम, नेहरू सेंटर तसेच युनिव्हर्सिटी ऑफ ईस्ट लंडन येथे भेट देत भारतीय विचारवंतांचा जागतिक प्रभाव, शिक्षण व्यवस्था आणि सांस्कृतिक वारशाचा अभ्यासही ते करणार आहेत. ब्रिटनमधील स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक सेवा वितरण, नागरी प्रशासन, शहरी नियोजन आणि नागरिकांचा लोकशाही प्रक्रियेत सहभाग यांचाही प्रत्यक्ष अभ्यास या दौऱ्यात करण्यात येणार आहे. या अभ्यास दौऱ्यातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे UNIVERSITY OF LONDON अंतर्गत INSTITUTE OF HIS-TORICAL RESEARCH आयोजित HISTORY OF POLITICAL IDEAS SEMINAR या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी प्रा. डॉ. सुनील नेवे यांची निवड झाली आहे. १ जुलै २०२६ रोजी होणाऱ्या या चर्चासत्रात ते सहभागी होऊन राजकीय विचारांचा इतिहास, लोकशाही मूल्ये, आधुनिक राज्यव्यवस्थेची वैचारिक पायाभरणी आणि जागतिक राजकीय विचारप्रवाहांवर आंतरराष्ट्रीय अभ्यासकांसोबत विचारमंथन करणार आहेत.भारतीय राज्यघटना आणि न्यायव्यवस्थेवर ब्रिटिश कायदेविषयक परंपरेचा प्रभाव लक्षात घेता हा अभ्यास विशेष महत्त्वाचा मानला जात आहे.

## १३५ वर्षांपूर्वीचा पाटणादेवी परिसर... आणि तो जतन करून ठेवणारा एक इंग्रज पुरातत्त्वज्ञ!

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी :** आज आपण पाहत असलेली पाटणादेवी परिसराची सुमारे १३५ वर्षांपूर्वीची दुर्मिळ छायाचित्रे ही केवळ जुन्या काळाची आठवण नसून आपल्या समृद्ध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाची जिवंत साक्ष आहेत. ही ऐतिहासिक छायाचित्रे ब्रिटिश पुरातत्त्वज्ञ हेन्री कझन्स (HENRY COUSENS) यांनी सन १८९२ मध्ये काढली होती. भारतातील पुरातत्त्व विभागात जवळपास ३५ वर्षे कार्यरत असलेल्या हेन्री कझन्स यांनी महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि मध्य भारतातील असंख्य प्राचीन मंदिरे, लेणी, शिलालेख आणि ऐतिहासिक वास्तूंचे सखोल सर्वेक्षण केले. त्याच अभ्यास दौऱ्यादरम्यान त्यांनी चाळीसगाव परिसरातील पाटण, पाटणादेवी, वाघळी, नागरदेवळा, संगमेश्वर, चांगदेव आणि इतर अनेक ऐतिहासिक स्थळांना भेट देऊन त्यांची छायाचित्रे, रेखाचित्रे आणि सविस्तर नोंदी तयार केल्या. हेन्री कझन्स यांनी आपल्या अहवालात पाटण परिसराचे वर्णन करताना लिहिले आहे की, "हे एक प्राचीन पण उजाड झालेले नगर आहे.



Henry Cousens
(13 Sept. 1854 – 1933)
ब्रिटिश पुरातत्त्वज्ञ व छायाचित्रकार

संपूर्ण दरी दाट जंगलाने व्यापलेली असून येथे अनेक भग्न मंदिरांचे अवशेष विखुरलेले आहेत. घुबड, कोल्हे, रानडुक्कर, बिबटे आणि अधूनमधून वाघ यांच्याशिवाय येथे फारशी वस्ती नव्हती." या नोंदींवरून आज हजारो भाविकांच्या श्रद्धास्थान असलेल्या पाटणादेवी परिसराचे एकेकाळचे जंगलमय आणि निर्जन स्वरूप स्पष्ट होते. तसेच १९व्या शतकातच या परिसराचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व जागतिक पातळीवर अधोरेखित होऊ लागल्याचेही या दस्तऐवजांतून दिसून येते. इतिहासाचा अभ्यास करताना आपण राजे, संत, समाजसुधारक आणि युद्धांचा उल्लेख करतो; मात्र आपल्या वारशाचे छायाचित्रे, नकाशे आणि नोंदींच्या माध्यमातून जतन करणाऱ्या संशोधकांचे योगदान अनेकदा दुर्लक्षित राहते.

## हरवलेल्या सिक्कीमच्या व्यक्तीला मिळाला माणुसकीचा आधार!

### पोलिस तत्परतेने कुटुंबाशी घडली सुखरूप भेट



जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी :** आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी होत चाललेल्या जीवनशैलीत माणुसकीची अनेकदा कमतरता जाणवते. मात्र धरणगाव शहरातील कृष्ण गीता नगर परिसरातील नागरिकांनी एका अनोळखी, मानसिकदृष्ट्या अस्वस्थ आणि असहाय्य व्यक्तिला मदतीचा हात देत सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी आदर्श घालून दिला. नागरिकांच्या संवेदनशीलतेला धरणगाव पोलिसांच्या तत्परतेची जोड मिळाल्याने सिक्कीममधील हरवलेल्या व्यक्तीची अखेर त्याच्या कुटुंबीयांशी सुखरूप भेट घडून आली. सिक्कीम राज्यातील वेस्ट सिक्कीम जिल्ह्यातील सित्तम येथील रहिवासी नारायण जीत कामी (वय ३९) हे मानसिक स्थिती बिघडल्यामुळे गेल्या पंधरा दिवसांपासून घरापासून दूर भटकत होते. भटकता-भटकता ते धरणगाव शहरातील कृष्ण गीता नगर परिसरात आले.

रात्रीच्या वेळी त्यांनी स्थानिक नागरिकांकडे जेवण व पाण्याची मागणी केली. त्यांची अवस्था पाहून परिसरातील नागरिकांनी दुर्लक्ष न करता त्यांना जेवण-पाणी देऊन आधार दिला. यावेळी महात्मा फुले हायस्कूलचे उपशिक्षक पी. डी. पाटील, एस. एन. कोळी तसेच मुख्याध्यापक जे. एस. पवार यांनी त्या व्यक्तीशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. तो फक्त तोडक्या हिंदीत बोलत असल्याने संवादात अडचणी येत होत्या. मात्र संयमाने विश्वास संपादन करत त्याच्याकडून माहिती मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला. यानंतर पत्रकार पी. डी. पाटील यांनी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष आबासाहेब राजेंद्र वाघ तसेच धरणगाव पोलीस प्रशासनाशी संपर्क साधला. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक उमाकांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील कदम तसेच पोलीस कर्मचारी सुमित बाविस्कर, योगेश पाटील, गुलाब महाजन आणि समाधान भागवत यांनी घटनास्थळी धाव घेत संबंधित व्यक्तीला ताब्यात घेऊन सुरक्षितपणे पोलीस ठाण्यात आणले. पोलिसांनी प्रेमाने संवाद साधल्यानंतर नारायण कामी यांनी आपल्या घरचा मोबाईल क्रमांक सांगितला. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधला असता त्यांची बहीण दिया नरबहादुर या मुंबईतील बांद्रा येथे राहत असल्याची माहिती मिळाली. त्यांना तात्काळ संपूर्ण घटनेची माहिती देण्यात आली. दरम्यान, पोलीस ठाण्यात नारायण कामी यांच्यासाठी जेवण व निवाऱ्याची व्यवस्था करण्यात आली. रात्रीच त्यांचे नातेवाईक मुंबईहून धरणगावकडे रवाना झाले. दुसऱ्या दिवशी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून नारायण कामी यांना त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. आपल्या हरवलेल्या नातेवाईकाची सुखरूप भेट झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी धरणगाव पोलीस, पत्रकार आणि कृष्ण गीता नगर परिसरातील नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## 'स्व. शंकर आप्पा निवासी मतिमंद विद्यालया'चे लोकार्पण उत्साहात

### दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज निवासी विद्यालयाची उभारणी; डॉ. भगवान तलवारे यांच्या प्रयत्नांना यश

जन सम्राट टाईम्स

**अमळनेर | प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या दिव्यांग सशक्तीकरण विभागांतर्गत मान्यताप्राप्त 'स्व. शंकर आप्पा निवासी मतिमंद विद्यालय' या निवासी विद्यालयाच्या नव्या वास्तूचे लोकार्पण अमळनेर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. दिव्यांग विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, निवास आणि सर्वांगीण विकासाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा महत्त्वपूर्ण उपक्रम साकारण्यात आला आहे. कै. बापूसो एन. झेड. मराठे अनाथ मतिमंद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, भारतीय दिव्यांग क्रिकेट कंट्रोल बोर्डाचे सह-चेअरमन तसेच स्पेशल ऑलिम्पिक भारत, महाराष्ट्रचे



एरिया डायरेक्टर डॉ. भगवान तलवारे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अथक प्रयत्नांतून या विद्यालयाची उभारणी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महामानवांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर विविध विभागांचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयाच्या मुख्य वास्तूचे उद्घाटन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी पी. सी. म्हस्के यांच्या हस्ते झाले. कार्यालयाचे उद्घाटन शिक्षण सभापती नावेद अहमद मुर्शिद शेख, वसतिगृहाचे उद्घाटन रामकृष्ण पाटील, फिजिओथेरपी कक्षाचे उद्घाटन भरत ललवाणी, शिघ्र निदान व हस्तक्षेप केंद्राचे उद्घाटन विश्वनाथ पाटील, पूर्व प्राथमिक विभागाचे उद्घाटन नरेंद्र संधानशिव, क्रीडा विभागाचे उद्घाटन अभिषेक पाटील, रिक्रिएशन हॉलचे उद्घाटन प्रताप साळी, स्वयंपाकगृहाचे उद्घाटन निलिमा पाटील, तर गणवेश व स्टेशनरी वाटपाचा शुभारंभ महेशबापू शेख यांच्या हस्ते करण्यात आला. विशेष अतिथी म्हणून डॉ. प्रसन्न जोशी व डॉ. उर्वी जोशी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. भगवान तलवारे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. डॉ. तलवारे व त्यांच्या कुटुंबीयांनीही सर्व मान्यवरांचा सन्मान करून कृतज्ञता व्यक्त केली. या लोकार्पण सोहळ्यास उपसरपंच दीपक जमादार, माजी सरपंच प्रशांत पाटील, भरत मराठे, रमेश मराठे, अजितसिंह जमादार, धनराज मराठे, गणेश चौधरी, मंगलाबाई कोळी, छायाबाई शिरसाठ, अर्चना पाटील, रेखाबाई कोळी, प्रतिभा कोळी यांच्यासह विविध क्षेत्रातील पदाधिकारी, ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ. भगवान तलवारे यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अशा दर्जेदार निवासी संस्थांची गरज अधोरेखित करत समाजाच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

### महामानवांच्या प्रतिमांचे पूजन

कै. बापूसो एन. झेड. मराठे अनाथ मतिमंद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, भारतीय दिव्यांग क्रिकेट कंट्रोल बोर्डाचे सह-चेअरमन तसेच स्पेशल ऑलिम्पिक भारत, महाराष्ट्रचे एरिया डायरेक्टर डॉ. भगवान तलवारे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अथक प्रयत्नांतून या विद्यालयाची उभारणी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महामानवांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर विविध विभागांचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# वारीतून जनसेवेची ऊर्जा मिळते; विठ्ठलभक्तीतून समाजसेवेची प्रेरणा – पालकमंत्री गुलाबराव पाटील

## चांदसर दिंडीचा उत्साहात प्रस्थान सोहळा; ३५ वर्षांची अखंड वारी

जन सम्राट टाईम्स



**पाळधी / चांदसर / जळगाव** धरणगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र चांदसर येथून पारंपरिक विठ्ठल-रुक्मिणी पालखी-दिंडीचे शुक्रवारी भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. टाळ-मृदंगाचा निनाद, अभंगांचा गजर आणि "ज्ञानोबा-तुकोबा", "पुंडलिक वरदे हरी विठ्ठल" या अखंड नामस्मरणाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या सोहळ्यात राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी उपस्थित राहून वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले, "वारी ही माझ्यासाठी केवळ धार्मिक परंपरा नसून आयुष्याचा श्वास आहे. गेल्या १७ वर्षांपासून मी या दिंडी प्रस्थान सोहळ्याला नियमित उपस्थित राहत आहे. दरवर्षी विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक होताना जनसेवा करण्याची नवी ऊर्जा, नवे बळ आणि प्रेरणा मिळते. विठू माऊलीच्या कृपेनेच जनतेची सेवा करण्याची ताकद मिळाली आहे." त्यांनी आपल्या राजकीय प्रवासातील आठवणींनाही उजाळा दिला. स्वर्गीय मुरलीधर अण्णा पवार यांनी एका जाहीर कार्यक्रमात "हा मुलगा एक दिवस आमदार होईल," असे केलेले भाकीत १९९९ मध्ये खरे ठरल्याचे सांगत त्यांनी चांदसर गाव आणि पवार परिवाराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. "आजपर्यंत मिळालेले प्रेम, विश्वास आणि आशीर्वाद हेच माझे खरे वैभव असून हे ऋण मी कधीही फेडू शकणार नाही," असे ते भावूक होऊन म्हणाले. गेली जवळपास ३५ वर्षे एकही वारी जाणीवपूर्वक चुकवलेली नाही, असे सांगताना त्यांनी वारीत मिळणाऱ्या अध्यात्मिक समाधानाचे महत्त्व अधोरेखित केले. "विठ्ठलाच्या नामस्मरणातून मनाला शांतता मिळते, तर वारकऱ्यांच्या सहवासातून समाजासाठी काम करण्याची प्रेरणा मिळते. समाजसेवा आणि विठ्ठलसेवा यापेक्षा मोठे भाग्य दुसरे नाही," असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष संजय पवार यांनी सलग बारा वर्षे वारीचा अनुभव कथन करत वारकरी संप्रदायातील शिस्त, समता, सेवाभाव आणि अध्यात्मिक संस्कारांचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना चांदसर वारीचे संस्थापक सुनील पवार यांनी या पारंपरिक दिंडीचा इतिहास उलगडला. चांदसर ते पंढरपूर असा तब्बल २४ दिवसांचा पायी प्रवास करून दिंडी पंढरपूर येथे पोहोचते.

### विठ्ठलसेवा यापेक्षा मोठे भाग्य दुसरे नाही

तेथे सहा दिवस मुक्काम करून विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन, नामस्मरण, भजन-कीर्तन आणि महाप्रसादाचा लाभ घेतला जातो, अशी माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमाचा समारोप "पुंडलिक वरदे हरी विठ्ठल... श्री ज्ञानदेव तुकाराम..." या अखंड नामगजरात आणि विठ्ठलाच्या जयघोषात झाला. यावेळी भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. सोहळ्यास खासदार स्मिता वाघ, आमदार राजूमामा भोळे, आमदार मंगेश चव्हाण, उपमहापौर मनोज चौधरी, डी. जे. भाऊसाहेब, सुभाष अण्णा पाटील, डॉ. राधेश्याम चौधरी, नगरसेवक दीपक सूर्यवंशी, अमित पाटील, अरविंद देशमुख, नितीन सबके, अमर जैन, रोहित निकम, जितेंद्र देशमुख यांच्यासह वारकरी, भजनी मंडळे आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महापालिकेच्या शिक्षण विभागात निरीक्षकांची भीषण कमतरता!

## १५० पैकी तब्बल १४३ पदे रिक्त

जन सम्राट टाईम्स

**मुंबई। प्रतिनिधी :** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात विभाग निरीक्षकांची मोठ्या प्रमाणात कमतरता निर्माण झाली असून त्याचा थेट परिणाम शाळांच्या प्रशासकीय कामकाजासह शैक्षणिक गुणवत्तेवर होत असल्याचे चित्र समोर आले आहे. शिक्षण विभागातील एकूण १५० मंजूर पदांपैकी तब्बल १४३ पदे रिक्त असून केवळ सात विभाग निरीक्षकांवर सुमारे एक हजार महापालिका शाळांची जबाबदारी असल्याने शिक्षण व्यवस्था ताणाखाली आली आहे. शिक्षण समितीच्या बैठकीत भाजपचे नगरसेवक निखिल व्यास यांनी हरकतीच्या मुद्द्याद्वारे हा गंभीर प्रश्न उपस्थित करत प्रशासनाचे लक्ष वेधले. विभाग निरीक्षकांची रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी करताना त्यांनी शिक्षण विभागातील विविध प्रशासकीय त्रुटींवरही बोट ठेवले. महापालिकेने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी विविध उपक्रम सुरू केले असले, तरी त्या उपक्रमांची अंमलबजावणी, अहवाल तयार करणे, माहिती संकलन आणि इतर प्रशासकीय जबाबदाऱ्या शिक्षकांवर टाकल्या जात असल्याने अध्यापनावर प्रतिकूल परिणाम होत असल्याची बाबही बैठकीत अधोरेखित करण्यात आली. निखिल व्यास यांनी शिक्षकांचे मुख्य कार्य अध्यापन असल्याचे स्पष्ट करत, प्रभावी अंमलबजावणी करावी आणि शिक्षकांना अशैक्षणिक व प्रशासकीय कामांपासून मुक्त करावे, अशी मागणीही त्यांनी केली. दरम्यान, शिक्षक भारतीचे बृहन्मुंबई महानगरपालिका युनिटचे अध्यक्ष विजयकुमार गोकुळ पाटील यांनी विभाग निरीक्षक भरतीबाबत महत्त्वाची मागणी केली. त्यांनी सांगितले की, महापालिकेच्या माध्यमिक शिक्षकांना विभाग निरीक्षक पदासाठी होणाऱ्या परीक्षेत समान संधी मिळाली पाहिजे. अनेक अनुभवी शिक्षकांकडे प्रशासकीय कामकाजाचा मोठा अनुभव असून त्याचा उपयोग शिक्षण व्यवस्थेच्या बळकटीसाठी होऊ शकतो, असे त्यांनी नमूद केले. महापालिकेत गेल्या अनेक वर्षांपासून विभाग निरीक्षकांची नियमित भरती झालेली नाही. परिणामी, सध्या कार्यरत असलेल्या केवळ सात निरीक्षकांवर सुमारे एक हजार शाळांच्या शैक्षणिक व प्रशासकीय देखरेखीची जबाबदारी आहे. शाळांना नियमित भेटी देणे, विद्यार्थ्यांची उपस्थिती तपासणे, विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे, शिक्षकांच्या कामकाजाचे मूल्यमापन करणे आणि शैक्षणिक गुणवत्तेवर देखरेख ठेवणे ही सर्व महत्त्वाची कामे अत्यल्प मनुष्यबळामुळे प्रभावीपणे पार पडत नसल्याचे समोर आले आहे.

जन सम्राट टाईम्स — सत्याचे प्राईम्स — ब्रेक न्यूज — ज

# सम्यक बुद्ध विहारात छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात

## सामाजिक समतेच्या विचारांना मानवंदना



जन सम्राट टाईम्स

**जळगाव। प्रतिनिधी :** जळगाव शहरातील रेल्वे वॉर्ड परिसरातील सम्यक विहार चौक येथील सम्यक बुद्ध विहारात छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शुक्रवार, दि. २६ जून २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता आयोजित कार्यक्रमात सामाजिक समता, शिक्षण आणि लोककल्याणाचा संदेश देणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन करण्यात आले. यावेळी आयु. डी. झेड. मोरे यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला, तर आयु. प्रा. निखिल रांजणकर यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात आयु. श्रावणबाबा सपकाळे, आयु. रवींद्र निकम आणि रवींद्र बाविस्कर यांच्या हस्ते आयु. डी. झेड. मोरे व प्रा. निखिल रांजणकर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रा. निखिल रांजणकर यांनी आपल्या मार्गदर्शनातून छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक न्याय, शिक्षणप्रसार, आरक्षण आणि बहुजन कल्याणासाठी केलेल्या ऐतिहासिक कार्याचा आढावा घेत उपस्थितांना प्रेरणादायी विचार दिले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. यशवंतराव मोरे, रोहित शिरसाट, विजय सुरवाडे आणि अशोक सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आयु. जितेंद्र सोनवणे यांनी केले. मोठ्या संख्येने उपस्थितांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याचे स्मरण करत सामाजिक समता आणि बंधुत्वाचा संदेश पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

### शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

जळगाव शहरातील रेल्वे वॉर्ड परिसरातील सम्यक विहार चौक येथील सम्यक बुद्ध विहारात छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शुक्रवार, दि. २६ जून २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता आयोजित कार्यक्रमात सामाजिक समता, शिक्षण आणि लोककल्याणाचा संदेश देणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन करण्यात आले. मोरे यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला, तर आयु. प्रा. निखिल रांजणकर यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

# नाजिया खान विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी!

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी :** ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (AIMIM) पक्षाच्या वतीने हजरत मोहम्मद पैगंबर यांच्याबाबत कथितरीत्या आक्षेपार्ह आणि अपमानास्पद वक्तव्य केल्याचा आरोप करत नाजिया इलाही खान यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात पक्षाच्या शिष्टमंडळाने धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले. निवेदनात म्हटले आहे की, नाजिया इलाही खान यांनी विविध माध्यमांवर तसेच एका मुलाखतीदरम्यान हजरत मोहम्मद पैगंबर, हजरत आयशा तसेच मजार, मशिदी आणि मदरसे यांच्याबाबत कथितरीत्या आक्षेपार्ह व धार्मिक भावना दुखावणारी विधाने केली आहेत. या कथित वक्तव्यांमुळे मुस्लिम समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून समाजामध्ये तीव्र नाराजी आणि असंतोषाचे वातावरण निर्माण झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. संबंधित व्हिडिओ, सोशल मीडिया पोस्ट तसेच उपलब्ध इतर पुराव्यांची सखोल चौकशी करण्यात यावी आणि चौकशीत संबंधित आरोप सिद्ध झाल्यास नाजिया इलाही खान यांच्याविरोधात तात्काळ प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) यावेळी नगरसेवक लल्लू सेठ, जावेद बिल्डर, शब्बीर पिंजारी, साजिद अली साई, वसीम मंत्री, सऊद सरदार, शोएब बेग मिर्झा, आमिर पठाण, पप्पू भैया मसालेवाले, शोएब पाल्टा, जाविद अ. लतिफ, मोईन शेख, जैद झाकीर, फैसल अन्सारी, सऊद आलम, शाबान अन्सारी, शोएब अन्सारी, मुज्जू शेख, आसिफ किराणा यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्याकडून अक्षय (बंटी) घोडेस्वार कुटुंबीयांचे सांत्वन

## मुंबईतील लाल डोंगर येथील निवासस्थानी भेट

जन सम्राट टाईम्स



**मुंबई (प्रतिनिधी):** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) मुंबई लाल डोंगरचे ज्येष्ठ कार्यकर्ते दिलीप एकनाथ घोडेस्वार यांचे सुपुत्र तथा बुद्धवाशी अक्षय उर्फ बंटी दिलीप घोडेस्वार यांच्या निधनानंतर केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी घोडेस्वार कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

मुंबईतील लाल डोंगर, एस.टी. रोड येथील अशापुरा बिल्डिंगच्या बी विंगमधील घोडेस्वार कुटुंबाच्या निवासस्थानी शनिवारी (दि. २० जून) रात्री सुमारे ९ वाजता रामदास आठवले यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी दिवंगत अक्षय (बंटी) घोडेस्वार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. तसेच कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन करत या दुःखद प्रसंगात धीर दिला. अक्षय उर्फ बंटी घोडेस्वार (वय ३०) यांचे १६ जून २०२६ रोजी मुंबईतील सायन रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या निधनामुळे घोडेस्वार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरातही हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्यावर चेंबूर येथील चारई स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. सांत्वन भेटीदरम्यान आरपीआयचे मुंबई प्रदेश संघटक रमेश घोक्षे, चेंबूर तालुका अध्यक्ष रवी गायकवाड, १५५ वॉर्ड अध्यक्ष दिलीप लागडे, पनवेल (सुकापूर) येथील माजी ग्रामपंचायत सदस्या प्रज्ञा अभिषेक घोडेस्वार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. अक्षय उर्फ बंटी घोडेस्वार यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, आई-वडील, भाऊ, वहिनी, बहिणी तसेच विस्तृत आप्तपरिवार असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनामुळे कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून विविध स्तरातून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# आंतरराज्यीय घरफोडी टोळीचा पर्दाफाश

जन सम्राट टाईम्स




**शिरपूर। प्रतिनिधी :** शिरपूर शहर पोलिसांनी आंतरराज्यीय घरफोडी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत मध्यप्रदेशातील तिघा आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून दोन घरफोडीच्या गुन्ह्यांतील एकूण ₹1 लाख 6 हजार 550 किमतीचे सोने-चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले असून शिरपूर शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दोन घरफोडीच्या गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. 12 मे 2026 रोजी मध्यरात्री नवे अंतुली (ता. शिरपूर) येथील रहिवासी विलास देविदास ईशी हे कुटुंबासह घराच्या स्लॅबवर झोपलेले असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश करून ₹44 हजार 550 किमतीचे सोने-चांदीचे दागिने लंपास केले होते. या प्रकरणी शिरपूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम 305(अ) व 331(4) अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांनी विशेष तपास पथकाची नियुक्ती केली. तपासादरम्यान नंदुरबार जिल्ह्यातील सारंगखेडा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका घरफोडीच्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या आरोपींचा या गुन्ह्याशी संबंध असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यानंतर ट्रान्सफर वॉरंटद्वारे आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. त्यामध्ये मिठाराम भावसिंग लडवी (वय 35), रतला मालसिंग मेहडे (वय 31) आणि जगदीश प्रताप किराडे (वय 32), सर्व रा. मध्यप्रदेश यांनी नवे अंतुली येथील घरफोडीची कबुली दिली. चोरीतील सोने-चांदीचे दागिने त्यांनी सेंधवा (मध्यप्रदेश) येथील सराफा व्यावसायिकाला विकल्याचेही सांगितले. पोलिसांनी आरोपींसह सेंधवा येथे जाऊन तपास केला असता किशोर मोतीलाल सोनी ज्वेलर्स यांनी संबंधित आरोपींकडून दागिने खरेदी केल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून वितळवलेल्या स्वरूपातील सोने व चांदीची लगड जप्त करण्यात आली. पुढील चौकशीत आरोपींनी दि. 14 मे 2026 रोजी बोरगाव (ता. शिरपूर) येथेही घरफोडी केल्याची कबुली दिली. त्या गुन्ह्यातील दागिनेही सेंधवा येथील शांतीलालजी सोनी ज्वेलर्स यांना विकल्याची माहिती त्यांनी पोलिसांना दिली. या तपासातून शिरपूर शहर पोलीस ठाण्यातील आणखी एका घरफोडीच्या गुन्ह्याची उकल झाली.

# फुलगाव ग्रामपंचायत पाच महिन्यांपासून ग्रामसेवकाविना

## निवेदन देऊनही प्रशासनाची दखल नाही

जन सम्राट टाईम्स



**भुसावळ | प्रतिनिधी:** भुसावळ तालुक्यातील फुलगाव ग्रामपंचायत गेल्या चार ते पाच महिन्यांपासून ग्रामसेवकाविना कार्यरत असल्याने गावातील विकासकामे ठप्प झाली असून नागरिकांना विविध शासकीय कामांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. कायमस्वरूपी ग्रामसेवकाची नियुक्ती न झाल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. फुलगाव हे तालुक्यातील लोकसंख्येच्या दृष्टीने महत्त्वाचे गाव असूनही ग्रामपंचायतीकडे कायमस्वरूपी ग्रामसेवक किंवा अतिरिक्त प्रभारही उपलब्ध नसल्याची परिस्थिती आहे.

परिणामी उत्पन्न, रहिवासी, जात, जन्म-मृत्यू दाखले, विविध शासकीय योजनांचे प्रस्ताव, विकासकामांची प्रशासकीय प्रक्रिया तसेच ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होत आहे. नियमानुसार ग्रामपंचायतीमध्ये किमान तीन वर्षांच्या कालावधीसाठी ग्रामसेवकाची नियुक्ती केली जाते. मात्र फुलगाव ग्रामपंचायत याला अपवाद ठरली असून गेल्या अनेक महिन्यांपासून हे पद रिक्त आहे. या संदर्भात सरपंच श्याम फुलगावकर यांनी भुसावळ पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांची अनेकदा प्रत्यक्ष भेट घेतली असून लेखी निवेदनेही सादर केली आहेत. मात्र वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून केवळ आश्वासने मिळत असून अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामसेवक हा ग्रामपंचायत प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्यातील महत्त्वाचा दुवा मानला जातो. त्याच्याच माध्यमातून गावातील विकासकामे, शासकीय योजना आणि प्रशासकीय प्रक्रिया राबविल्या जातात. त्यामुळे ग्रामसेवक नसल्याने गावाच्या विकासाला मोठा फटका बसत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. फुलगाव ग्रामपंचायतीस तातडीने कायमस्वरूपी ग्रामसेवकाची नियुक्ती करावी, अशी मागणी सरपंच श्याम फुलगावकर यांच्यासह संपूर्ण ग्रामस्थांनी केली आहे. ही मागणी लवकरात लवकर पूर्ण न झाल्यास सरपंच व ग्रामस्थांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

शासकीय योजनांचे प्रस्ताव, विकासकामांची प्रशासकीय प्रक्रिया तसेच ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होत आहे. नियमानुसार ग्रामपंचायतीमध्ये किमान तीन वर्षांच्या कालावधीसाठी ग्रामसेवकाची नियुक्ती केली जाते. मात्र फुलगाव ग्रामपंचायत याला अपवाद ठरली असून गेल्या अनेक महिन्यांपासून हे पद रिक्त आहे. या संदर्भात सरपंच श्याम फुलगावकर यांनी भुसावळ पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांची अनेकदा प्रत्यक्ष भेट घेतली असून लेखी निवेदनेही सादर केली आहेत.

जन सम्राट टाईम्स — सत्याचे प्राईम्स — अँकर न्यूज — ज

# एसआयआर काम महत्त्वाचे असेल तर शाळाच बंद करा

## विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी कोण घेणार, शिक्षक-पालकांचा सवाल

जन सम्राट टाईम्स




**मुंबई । प्रतिनिधी:** मुंबईतील शिक्षकांना मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेसाठी पूर्णवेळ नियुक्त करण्याच्या आदेशांमुळे शिक्षक संघटनांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. "जर शासनाला एसआयआरचे कामच अधिक महत्त्वाचे वाटत असेल, तर शाळाच बंद करा आणि शिक्षकांना केवळ बीएलओची जबाबदारी द्या," अशा शब्दांत विविध शिक्षक संघटनांनी संताप व्यक्त केला आहे. शिक्षकांना निवडणूक कामासाठी सातत्याने वर्गाबाहेर पाठविल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होत असल्याची चिंता शिक्षक आणि पालकांकडून व्यक्त केली जात आहे. धारावी मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी २५ जून रोजी अनेक अनुदानित शाळांच्या मुख्याध्यापकांना पत्र पाठवून २९ जूनपासून मतदार यादी सखोल पुनरीक्षण कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत शिक्षकांना पूर्णवेळ एसआयआर कामासाठी नियुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. शारदाश्रम, बालमोहनसह अनेक नामांकित शाळांतील शिक्षकांची या कामासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे नियमित अध्यापनाचे नियोजन विस्कळीत होण्याची भीती व्यक्त होत आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तहसीलदार आणि मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून सातत्याने शिक्षकांची बीएलओ आणि एसआयआर कामासाठी नियुक्ती केली जात आहे. मात्र, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, मूलभूत साक्षरता आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर दिला जात असताना शिक्षकांना वारंवार निवडणुकीच्या कामात गुंतवणे ही विरोधाभासी भूमिका असल्याचे शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे. पुरोगामी शिक्षक संघटनेचे अध्यक्ष तानाजी कांबळे यांनी प्रश्न उपस्थित करत म्हटले की, "बहुतांश शिक्षक निवडणुकीच्या कामात गुंतले असताना विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करणार कोण? गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आग्रह धरणारे शासनच शिक्षकांना वर्गाबाहेर पाठवत असेल, तर त्याचा फटका विद्यार्थ्यांनाच बसणार आहे." 'शिक्षक भारती' बृहन्मुंबई महानगरपालिका माध्यमिक शिक्षक संघटनेचे उत्तर विभाग अध्यक्ष विजयकुमार गोकुळ पाटील यांनीही तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. "जर एसआयआरचे काम इतकेच महत्त्वाचे असेल, तर शिक्षकांना पूर्णवेळ त्याच कामासाठी द्या.

### गंभीर दखल घेण्याची मागणी

शाळा आणि एसआयआर या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळणे अत्यंत जिकिरीचे झाले आहे. शासनाला शाळा चालवायच्या नसतील, तर त्या बंद कराव्यात. शिक्षकांशिवाय वर्ग कोण चालविणार? विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोण घेणार?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.समर्थ शिक्षक संघटनेचे मुंजा गिरी यांनीही शिक्षकांवर वाढत असलेल्या अशैक्षणिक कामाच्या ओझ्याबाबत नाराजी व्यक्त करत, अध्यापनावर होणाऱ्या परिणामाची गंभीर दखल घेण्याची मागणी केली.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306